MHRT050000052026

**फौजदारी किरकोळ अर्ज क्र.१/२०२६**

**श्री.राकेश बाबाराम ढेबे**

**वि.**

**महाराष्ट्र सरकार व.२**

## निशाणी १ वरील आदेश

अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ५०३ प्रमाणे खेड पोलीस स्टेशन येथे दाखल करण्यात आलेला गुन्हा रजिस्टर क्र.३९३/२०२५ मध्ये जप्त केलेले चार बैलांचा अंतरीम ताबा मिळणेकरीता दाखल केला आहे.

०२. अर्जदारच्या कथनानुसार तो मौजे चिरणी (सोमेश्वरवाडी), ता.खेड, जि.रत्नागिरी येथील रहिवासी आहे. सदरचे जप्त बैल हे त्यांच्या मालकीचे असून त्यांचा वापर ते शेतीच्या कामाकरीता करतात. अर्जदाराचे असेही कथन आहे की, सदर गुन्ह्याशी त्याचा संबंध नाही. सदरचे बैल हे सामनेवाला क्र.२ यांच्या ताब्यात आहेत. सदर प्राणी परत मिळाल्यास अर्जदार ते प्राणी विकणार नाहीत अथवा कोणत्याही कारणास्तव त्यांची नुकसानी करणार नाहीत. अर्जदार हे सदर प्राण्यांना चांगल्या प्रकृतीत ठेवतील व न्यायालयाच्या आदेशानुसार सदर प्राण्यांना हजर करतील. अर्जदारा यांनी नि.३ सोबत प्रथम खबर अहवाल व स्वतःचे आधारकार्ड ही कागदपत्रे सादर केली आहेत.

०३. प्रस्तुत अर्जावर तपासिक अंमलदार, सरकारी वकील व सामनेवाला क्र. २ यांचे म्हणणे मागविण्यात आले. त्याप्रमाणे तपासिक अंमलदार यांनी नि.०६ वर म्हणणे दिले. त्यांच्या म्हणण्यानुसार सदरचे बैल हे अर्जदार यांच्या मालकीचे असल्याचे तपासात त्यांना निष्पन्न झाले आहे. त्यामुळे योग्य त्या अटी व शर्तींवर सदर बैल अर्जदारास परत करण्यास त्यांची कोणतीही हरकत नाही. तसेच बैलांचा ताबा देण्यापुर्वी अर्जदार यांनी सामनेवाला क्र.२ यांना सदर गुरांवर आतापर्यंत झालेला खर्च देण्याबाबत आदेश करण्याची विनंती केली.

०४. प्रस्तुत अर्जावर सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी नि.०८ वर म्हणणे दिले. त्यांच्या म्हणण्यानुसार अर्जदार यांनी सदर बैल हे त्यांच्या मालकीचे असल्याबाबत कोणताही दाखला प्रस्तुत अर्जासोबत दाखल केला नाही. पोलीसांनी आरोपी यांच्याकडे सदर प्राण्यांबाबत विचारणा केली असता त्यांनी सदरची जनावरे हे कत्तलीकरीता सांगली येथे घेऊन जात असल्याचे सांगितले. अर्जदार हा गावातून कमी किंमतीमध्ये प्राण्यांची खरेदी करुन जास्त किंमतीमध्ये कत्तलीसाठी त्यांची विक्री करतो. अर्जदार यांच्याकडून सदर गुरांच्या अन्न–पाण्याची व्यवस्था होत नसेल तर अर्जदार यांना गुरे परत करु नयेत. तसेच सामनेवाला क्र.२ हे सदर गुरांची योग्य प्रकारे काळजी व संगोपन करु शकतात, त्यामुळे सदर गुरांचा ताबा हा सामनेवाला क्र.२ यांच्याकडेच द्यावा अशी विनंती केली आहे.

०५. प्रस्तुत कामी श्री. संत ज्ञानेश्वर माऊली जीवन मुक्ती धाम सेवा संस्थान गोशाळेच्या वतीने सामनेवाला क्र.२ यांनी म्हणणे देवून सदरचे बैल अर्जदार यांच्या ताब्यात देण्यास विरोध दर्शविला आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, लोकांच्या म्हणण्यानुसार अर्जदाराने सदर गुरे ही आरोपीला विकली आहेत. तसेच अर्जदाराला सदर गुरे परत दिल्यास तो सदर गुरे परत आरोपीला कत्तलीकरीता देऊ शकतो. त्यामुळे सदर गुरांचा ताबा आपल्याकडेच राहावा अशी सामनेवाला क्र.२ यांनी विनंती केली आहे.

०६. अर्जदार यांनी प्रस्तुत अर्जाद्वारे परत मागितलेले जप्त बैल हे त्यांच्या मालकीचे आहेत हे दर्शविणारा कोणताही पुरावा सादर केलेला नाही. तसेच अर्जदार हा शेतकरी आहे हे दर्शविणारा सुध्दा कोणताही पुरावा सादर केलेला नाही. तपास अधिकारी यांच्या म्हणण्यानुसार जर अर्जदार हा जप्त गुरांचा मालक असल्याचे त्यांना तपासात निष्पन्न झाले आहे, तर ती गुरे आरोपी क्र.१ कुठे व का घेऊन जात होता याबाबत अर्जदाराकडून कोणतेही स्पष्टीकरण आलेले नाही. उलट प्रथम खबरी अहवालमध्ये आरोपी संजु साळुंखे याच्याकडे बैलांच्या खरेदी–विक्रीची पावती तसेच वैद्यकीय तपासणीचे प्रमाणपत्र व वाहतुकीचा परवाना नव्हता व तो सदर गुरे सांगली येथे

कत्तलीकरीता घेऊन जात होता अशी कबुली दिली होती. सदर गुरे ही बोलेरो पिकअप वाहनामध्ये दाटीवाटीने कोंबुन आखुड दोरीने बांधलेली आढळून आली. अशा प्रकारची गुरांची केलेली वाहतुक ही संशयास्पद दिसून येते. त्यामुळे सहाय्यक सरकारी अभियोक्ता व सामनेवाला क्र.२ यांच्या आक्षेपामध्ये तथ्य दिसुन येते. प्रस्तुत अर्जावर आरोपींचे सुध्दा म्हणणे मागविण्यात आले, परंतु आरोपींनी त्यांचे म्हणणे सादर केले नाही. एकंदरीत, अभियोग पक्षाची हकिकत व अर्जदाराने प्रस्तुत अर्जामध्ये सदर गुरे ही आरोपी क्र.१ च्या ताब्यात कशाकरीता दिली होती याबाबत स्पष्टीकरण न दिल्यामुळे सदर गुरे ही सामनेवाला क्र.२ यांच्याकडे अधिक सुरक्षित आहेत. करीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करतो.

## आदेश

१. सदरचा अर्ज नामंजूर करणेत येतो.

CHAVAN SANJAY MOTIRAM
Digitally signed by CHAVAN SANJAY MOTIRAM
Date: 2026.03.10 16:51:19 +0530

**(एस. एम. चव्हाण)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
खेड, ता. खेड, जि.रत्नागिरी.

**दिनांकः १०.०३.२०२६**

# CERTIFICATE

| | | |
|---|---|---|
| Case No. | : | Cri.M.A.No.1/2026 |
| I affirm that the contents of this pdf file order are same word as per original order. | | |
| Name of Stenographer | : | Sou. S. J. Salunkhe |
| Court Name | : | Jt. CJJD & JMFC, Khed |
| Date of Decision | : | 10.03.2026 |
| Order signed by Presiding Officer on | : | 10.03.2026 |
| Order uploaded on | : | 10.03.2026 |